आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 17.11.2026 **वार : मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मनिला इथं 23 व्या आसियान-भारत आणि 21 व्या पूर्व आशिया या दोन शिखर परिषदांमध्ये सहभागी होणार
2. भारताची आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या परिषदेवर फेरनिवड
3. उदयोन्मुख कलाकारांसाठी शोधासाठी आकाशवाणीतर्फे आजपासून एआयआर रायझिंग स्टार्स विशेष संगीत मैफिलींचं आयोजन
4. सॅफ अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात लढत आणि
5. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं अकवान चक्रीवादळ येत्या शुक्रवारी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकण्याची शक्यता

<u>पंतप्रधान-फिलिपिन्स</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज फिलिपिन्सची राजधानी मनिला इथं 23 व्या आसियान-भारत आणि 21 व्या पूर्व आशिया या दोन शिखर परिषदांमध्ये सहभागी होणार आहेत. यावर्षीच्या आसियान गटाचा अध्यक्ष या नात्यानं फिलिपिन्सनं या दोन्ही शिखर परिषदांचं आयोजन केलं आहे. या शिखर परिषदांमध्ये पंतप्रधान मोदी आसियान नेत्यांची भेट घेणार आहेत. या भेटींमध्ये ते या नेत्यांशी भारताची त्यांच्या देशांसोबतची तसंच या प्रदेशिक गटाबरोबरची सर्वंकष धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्याबाबत तसंच सामायिक हिताच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासंदर्भात चर्चा करतील.

23 व्या आसियान -भारत शिखर परिषदेत सहभागी नेत्यांकडून आसियान -भारत 2026 ते 2030 च्या कृतीआराखड्यासह सर्वंकष धोरणात्मक भागीदारीच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येणार आहे. तसंच उभयपक्षी सहकार्याची भविष्यातील दिशा या मुद्द्यावरही चर्चा करण्यात येईल. तत्पूर्वी पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल फिलिपीन्सची राजधानी मनिलामध्ये पोहोचले. फिलीपिन्सच्या माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान विभागाचे सचिव रॉबर्ट जोसेफ जे मॉंटेस डी क्लारो यांनी त्यांचं स्वागत केलं. मनिला इथल्या भारतीय समुदायाकडूनही त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. पंतप्रधानांच्या सन्मानार्थ फिलिपीनचे अध्यक्ष फर्डिनांड मार्कोस यांनी काल स्नेहभोजन आयोजित केलं होतं.

<u>अमित शाह झेडपी</u>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या पुणे दौऱ्यात काल त्यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उभारण्यात आलेल्या दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमात बोलताना अमित शहा यांनी, अजितदादा पवार हे ग्रामीण विकास आणि सहकारक्षेत्राचे चालते-बोलते ज्ञानकोष होते अशा शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दुर्मिळ डिजिटायझेशन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पणही अमित शहा यांच्या हस्ते काल झालं. मराठा इतिहास जगासमोर आणण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

नौदल-स्वामीनाथन

भारताच्या सागरी क्षेत्रातील चीनच्या वाढत्या घुसखोरीवर नौदलाचं बारकाईनं लक्ष असल्याचं नौदलप्रमुख ऍडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी सांगितलं. नवी दिल्लीत एका खासगी संस्थेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत ते काल बोलत होते. गेल्या चार दशकांत नौदलात आमूलाग्र बदल झाले असून नौदल सध्याच्या युद्धतंत्रांसोबतच भविष्यातल्या संघर्षालाही तयार असल्याचं स्वामीनाथन म्हणाले.

भारत फेरनिवड

भारताची आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या परिषदेवर फेरनिवड करण्यात आली आहे. कतारमध्ये दोहा इथं आयोजित 'आयटीयू प्लॅनिपोटेन्शिअरी कॉन्फरन्स 2026' मध्ये पुढील कार्यकाळासाठी भारताची पुन्हा एकदा निवड करण्यात आली. डिजिटल भविष्याप्रती भारताची कटिबद्धता अधोरेखित करत, भारतीय मिशनने सर्वसमावेशक, सुरक्षित आणि शाश्वत डिजिटल भविष्य घडवण्यासाठी भारत सर्व सदस्य देशांसोबत मिळून काम करण्यास वचनबद्ध असल्याचं सांगितलं.

भूपेंद्र यादव

जागतिक न्याय्य संक्रमणाचा अजेंडा; संवाद आणि अनुभवांची देवाणघेवाण एवढ्यापुरताच मर्यादित न ठेवता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची गरज पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल व्यक्त केली. तुर्कीएमधील अंताल्या इथं आयोजित संयुक्त राष्ट्र एफ.सी.सी.सी कॉप-31मध्ये यूएई जस्ट ट्रांझिशन वर्क प्रोग्रॅम अंतर्गत जस्ट ट्रांझिशन या विषयावर आयोजित वरिष्ठ मंत्र्यांच्या चौथ्या वार्षिक गोलमेज बैठकीला संबोधित करताना यादव यांनी भारत समावेशक आणि न्याय्य जागतिक संक्रमणासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला.

आकाशवाणी-रायझिंग

उदयोन्मुख संगीत कलाकारांचा शोध घेण्यासाठी आकाशवाणीने राष्ट्रीय पातळीवर एआयआर रायझिंग स्टार्स या विशेष संगीत मैफिलींचं आयोजन केलं आहे. त्याचा पहिला टप्पा आजपासून 30 नोव्हेंबरपर्यंत देशभरात 26 ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. त्यामध्ये 30 वर्षांखालील तरूण कलाकारांना सादरीकरण करता येणार आहे. आकाशवाणीच्या 90 व्या वर्धापन दिनानिमित्त हा उपक्रम राबवला जात आहे.

युवराज-विल्यम

ब्रिटनचे युवराज विल्यम आणि त्यांची पत्नी कॅथरिन तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. युवराज विल्यम त्यानी सुरू केलेल्या अर्थशॉट या जागतिक पर्यावरण पुरस्कार वितरणासाठी मुंबईत आले आहेत. पर्यावरणाचे रक्षण आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपायांचा शोध घेणं आणि त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं हा पुरस्कार दिला जातो. महिला हाऊसिंग ट्रस्ट आणि महिंद्रा लास्ट माईल मोबीलिटी या दोन भारतीय संस्थांची यंदा या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय समिट

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं उद्यापासून नवी दिल्लीत 'समावेशी नीती संकल्प' या दोन दिवसीय विभागीय शिखर परिषद आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार आयोजित करण्यात येत असलेल्या विभागीय शिखर परिषदांच्या मालिकेतील ही तिसरी परिषद आहे. केंद्र आणि राज्यांमध्ये अधिक घनिष्ठ सहकार्य प्रस्थापित करून, राष्ट्रीय प्राधान्य क्रमांची सामूहिक जबाबदारी स्वीकारणं आणि विकासात्मक परिणाम अधिक वेगाने साध्य करणं हा या परिषदेच्या आयोजनाचा उद्देश आहे.

युएस-सल्ला

माद्रिद इथल्या अमेरिकी दूतावासानं येत्या सुटीच्या हंगामात युरोपात प्रवासासाठी जाणाऱ्या अमेरिकन नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला जारी केला आहे. युरोपात सुटी साजरी करताना हंगामी उत्सव, पर्यटन स्थळं, वर्दळीची वाहतूक केंद्रं, शॉपिंग मॉल्स, प्रार्थनास्थळं अशा गर्दीच्या ठिकाणी वावरताना अमेरिकन नागरिकांनी दक्षता बाळगावी असं त्यांना आवाहन करण्यात आलं आहे. मोठा जमाव असलेल्या ठिकाणी किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दहशतवादी किंवा गुन्हेगारांकडून अमेरिकींना लक्ष्य करण्याची शक्यता असल्याचा धोक्याचा इशाराही माद्रिदच्या अमेरिकी दूतावासानं दिला आहे.

टँकर आग

होर्मुझच्या सामुद्रधुनी आणि आसपासच्या भागात गेल्या 24 तासांत किमान चार तेलवाहू जहाजांचे नुकसान झालं आहे. समुद्री सुरुंगाला धडकल्यानंतर जहाजाला आग लागण्याची चौथ्यांदा घटना घडल्याचं इराणी नौदलानं म्हटलं आहे. तर यूके मेरिटाइम ट्रेड ऑपरेशन्स या संस्थेने ओमानच्या किनाऱ्याजवळ आणखी एका जहाजावर हल्ला झाल्याचं वृत्त असल्याचं म्हटलं आहे. इराणच्या नौदलाच्या म्हणण्यानुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील भागात समुद्री सुरुंगाला धडकल्यानंतर जहाजानं पेट घेतला. हे जहाज आपली दिशादर्शन प्रणाली बंद ठेवून प्रतिबंधित सागरी क्षेत्रातून प्रवास करत होतं, असा आरोप इराणी नौदलाने केला आहे.

बेरोजगारी दर

देशाचा बेरोजगारीचा दर ऑक्टोबर महिन्यात किंचित कमी होऊन 4 पूर्णांक 9 शतांश टक्क्यांपर्यंत आला. सप्टेंबर महिन्यात हा दर 5 टक्के होता, असं काल जारी करण्यात आलेल्या सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे. 15 वर्षापुढील वयाच्या बेरोजगारांची संख्याही गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत तीन दशांश टक्क्यांनी कमी झाली आहे. शहरी भागात गेल्या सप्टेंबरमधे बेरोजगारीचा दर 6 पूर्णांक 9 दशांश टक्के होता तो ऑक्टोबरमधे 6 पूर्णांक 7 दशांश टक्क्यांवर आला. महिलांच्या रोजगारात वाढ होऊन तो 35 टक्के झाला आहे. यंदाच्या फेब्रुवारीपासून महिला रोजगाराचा हा सर्वोच्च दर आहे. ग्रामीण भागात हा दर साडे 39 टक्के झाला आहे. पुरुषांच्या रोजगारात फारसा फरक पडलेला नाही.

चारधाम-बंद

चारधामपैकी एक असलेल्या बद्रीनाथधाम मंदिराची द्वारं काल प्रथेनुसार हिवाळ्यानिमित्त बंद करण्यात आली. विधिवत पूजा आणि वैदिक मंत्रोच्चारांच्या घोषात मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. चार धाम मधील

यमुनोत्री, गंगोत्री आणि केदारनाथ या इतर तीन मंदिरांचे दरवाजे यापूर्वीच बंद करण्यात आले आहेत, त्यामुळे आता चार धाम यात्रा आता हिवाळ्याच्या कालावधीपुरती बंद करण्यात आली आहे.

सॅफ फुटबॉल

दक्षिण आशियाई फुटबॉल फेडरेशन अर्थात सॅफ अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना आज, भारत आणि पाकिस्तान संघादरम्यान बांग्लादेशातील ढाक्यात खेळला जाणार आहे. भारताने या स्पर्धेचं आतापर्यंत विक्रमी 9 वेळा विजेतेपद पटकावलं असून, सलग तिसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावून इतिहास रचण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

हवामान-अकवान वादळ

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं अकवान चक्रीवादळ येत्या शुक्रवारी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीतील नेल्लोर आणि तुणी या भागात धडकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. शुक्रवारपर्यन्त हे चक्रीवादळ अति तीव्र स्वरूप धारण करण्याची शक्यता असून, या काळात, ताशी 120 ते 145 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असल्याचं भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉक्टर मृत्युंजय मोहपत्रा यांनी आकाशवणीशी बोलताना सांगितलं.वादळाची तीव्रता लक्षात घेऊन मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार